वाचा : १) संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक स्था १८ ब /सन २००७-०८/लेप ३/पंरास/१६९४,दिनांक २७/११/२००८

२) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ३६, दिनांक ३०/०७/२००९

३) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक २३, दिनांक १९/०४/२०११

४) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक १५, दिनांक १५/०९/२०१५

५) संचालनालयाचे स्थायी आदेश क्रमांक ७/२०१७, दिनांक १८/०४/२०१७

६) संचालनालयाचे स्थायी आदेश क्रमांक १४/२०१७, दिनांक १२/०९/२०१७

---

स्था.१८/ब/जि.प. लेखापरीक्षण बाबत/२०१९/वलेप अहवाल/ न.क्र.१८३

संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य
कोकण भवन, सहावा मजला
नवी मुंबई ४००६१४

**स्थायी आदेश क्रमांक ०१/२०१९ दिनांक : ३०/०३/२०१९**

विषय - सहसंचालक संनियंत्रण व अंतिमिकरण करत असलेल्या जिल्हा परिषद विभागाच्या लेखापरीक्षणाबाबत.

**प्रस्तावना** -

उपरोक्त वाचा मधील क्रमांक ३ चे आदेशान्वये दरवर्षी माहे जुलैपासून जिल्हा परिषदेचे विविध विभाग व पंचायत समिती यांचे लेखापरीक्षण हाती घेऊन हे लेखापरीक्षण माहे सप्टेंबर अखेर पर्यंत पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वाचा मधील उर्वरीत आदेशांन्वये जिल्हा परिषद विभागांचे लेखापरीक्षणाचे अनुषंगाने बांधकाम, लघुपाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा व वित्त विभागांचे लेखापरीक्षणाबाबत संनियंत्रण व अंतिमिकरण विभागीय सह संचालक करतील असे निर्देश देण्यात आले आहेत.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम ८ नुसार लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर शक्य तितक्या लवकर परंतु तीन महिन्यापेक्षा अधिक नाही अशा कालावधीत लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करणे आवश्यक आहे. तथापी विभागीय सह संचालकांकडे संनियंत्रण व अंतिमीकरणाबाबत सोपविलेल्या जिल्हा परिषद विभागांचे बाबत अधिनस्त स्थानिक निधी जिल्हा कार्यालयांचे प्रारुप अहवाल साधारणत: एकाच वेळी प्राप्त होत असल्याने अनुषंगिक कार्यवाहीस व पर्यायाने विहीत मुदतीत अहवाल प्रसिद्ध करण्यास विलंब होतो. यास्तव जिल्हा परिषदेच्या उपरोक्त नमुद चार विभागांचे लेखापरीक्षण प्रभावीरीत्या करण्याचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे पुरक आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**आदेश** :-

जिल्हा परिषद व पंचायत समितीचे लेखापरीक्षण नियोजन करताना माहे जुलै मध्ये काही पंचायत समित्यांचे लेखापरीक्षणासोबत जिल्हा परिषदेचे बांधकाम व ग्रामीण पाणी पुरवठा/लघुपाटबंधारे यापैकी एक

असे दोन विभागांचे लेखापरीक्षण नियोजन करण्यात यावे, जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाचे लेखापरीक्षण सर्व पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर करण्यात यावे. तथापि प्रत्यक्ष लेखापरीक्षणाची सुरवात वित्त विभागापासून प्रमाणकांचे ट्रेसिंगद्वारे माहे मे अंती सुरु करण्यात यावी.

सदर निर्देश सन २०१८-१९ चे लेखापरीक्षणापासून लागू राहतील.

**(संजय अनपट)**
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य

प्रत : सर्व विभागीय सह संचालक व सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जिल्हा कार्यालये.